Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 868 – 873
DOI: 10.5281/zenodo.10281913

Original Research Article

# महात्मा गांधीजी आणि स्वातंत्र्यसंग्राम

मुंडे सोनाली वामनराव

संशोधक विद्यार्थिनी, शिक्षणशास्त्र संकुल, नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sonalimunde.2011@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

दे दी हमें आज़ादी
बिना खड्ग बिना ढाल
साबरमती के संत तूने
कर दिया कमाल

1920 मध्ये टिळकांच्या मृत्युनंतर राष्ट्रीय चळवळीची सुत्रे महात्मा गांधीकडे आली आणि गांधींजींच्या सत्याग्रहासारख्या अभिनव तंत्राने राष्ट्रीय चळवळ व्यापक होऊन स्वातंत्र्य लढ्याच्या नव्या पर्वास सुरुवात झाली.

भारताच्या स्वातंत्र्याची यशोगाथा जेव्हा जेव्हा गायली जाईल तेव्हा तेव्हा महात्मा गांधींचे नाव आणि त्यांच्या कार्याचा उल्लेख झाल्याशिवाय राहणार नाही आणि आज देशाला स्वातंत्र्य मिळुन 76 वर्ष पुर्ण झाले तरी गांधीजींच्या कार्याचा कुणालाही विसर पडलेला नाही. हातात कुठलेही शस्त्र न घेता देखील क्रांती घडवुन आणली जाऊ शकते हे संपुर्ण जगाला गांधीजींनी दाखवुन दिले.

गांधीजी हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक प्रमुख नेते आणि महान तत्वज्ञ होते ते पेशाने केवळ वकीलच होते असे नसुन वसाहत विरोधी होते.जगभरातील अनेक देशांनी महात्मा गांधीजीकडुन प्रेरणा घेऊन अहिंसक चळवळीचा त्यांच्या देशात वापर केला “महात्मा“ म्हणजे महान असा आत्मा आणि गाधीजींचा महात्मा असा उल्लेख 1914 मध्ये प्रथम दक्षिण आफ्रिका देशात केला गेला.

## उद्दिष्टे

महात्मा गांधींनी स्वातंत्रयसंग्रामात केलेल्या कार्याची माहिती घेणे.

गांधीजीचे स्वातंत्र्यलढयात अभुतपुर्व कार्य झालेले आहे, त्याची आपण पुढील प्रमाणे माहिती घेऊया.

**१. चंपारण्य सत्याग्रह**

1916 च्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात राजकुमार शुक्ला या नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्याने गांधीजींना आपल्यावरील अन्यायाबाबत सांगितले.

इंग्रज सरकार भारतीय शेतकऱ्यावर किती जुलुम जबरदस्ती करुन अन्याय करायचे याचे जिवंत उदाहरण गांधीजींसमोर होते या इंग्रजांना धडा शिकवला पाहीजे असे गांधीजींनी ठरवले आणि 10 एप्रिल 1917 रोजी गांधीजींनी बिहारमधील चंपारण्यजनिक मोतीहारी येथे सत्याग्रह यशस्वी केला व ब्रिटीश मळेवाल्यांच्या जाचातुन नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची सुटका केली. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी महात्मा गांधीजींना राजकुमार शुक्ला व त्यांच्यासारख्या अनेक शेतकऱ्यांनी साथ दिली कॉंग्रेस पक्षाच्या कुठल्याही मदतीशिवाय झालेले हे आंदोलन बिहारमध्ये अहिसक मार्गाने लढल्याने चर्चेचा विषय ठरले होते आणि याच आंदोलनामुळे इंग्रज सरकारला गांधीजींसमोर झुकावे लागले, अशा पदध्तीने मागील 135 वर्षापासुन  बिहारमध्ये नीळ उत्पादन होत होते ते हळु हळु बंद झाले.

**२. खेडा सत्याग्रह**

दिवसेंदिवस लोकांमध्ये गांधीजी विषयी प्रसिध्दी मिळत चालली होती. लोक आपल्या समस्या  घेऊन येत असत. अशीच एक समस्या घेऊन काही शेतकरी गांधीजींकडे आले इंग्रज सरकार हे शेतकऱ्याकडुन बळजबरीने जास्तीचा कर वसुल करत असत.

या विरोधात महात्मा गांधींनी गुजरात मधील खेडा जिल्हयात इंग्रज सरकारच्या विरोधात 1918 मध्ये सर्वात मोठे शेतकरी आंदोलन उभारले त्या आंदोलनाला आज 105 वर्ष पुर्ण झाले आहेत. चंपारण्य येथील सत्याग्रहानंतर खेडा जिल्हयातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी गांधीजींनी हा सत्याग्रह उभारला.

1918 मध्ये गांधीजी अहमदाबादमधील गिरणी कामगारांच्या हक्कासाठी लढत होते आणि तो लढा त्यांनी जिंकला देखील याचा परिणाम असा झाला कि, कामगारांचे पगार 35 टक्यांनी वाढले तो लढा चालु असतांनाच शेतकऱ्यांचे पीक नष्ट झाले तरी सक्तीने शेतसारा (एक प्रकारचा कर) वसुल केला जात होता. मग त्याच वेळी गांधीजींनी मोहनलाल पांडया नामक स्थानिक शेतकऱ्याच्या मदतीने साराबंदी चळवळ सुरु केली व सरकारकडुन शेतसारा माफ करुन घेतला.

सिडने रौलेट समितीच्या शिफारशीनुसार 1919 साली  सरकारने एक रौलेट कायदा ज्याला काळा कायदा म्हणुन देखील ओळखले जाते तो कायदा संमत केला. त्यानुसार कोणत्याही भारतीयास विनाचौकशी तुरुंगात टाकणे, सरकार विरोधी विचारांचे साहित्य छापणे व जवळ बाळगणे हा राजद्रोह ठरवण्यात आला. 6 एप्रिल 1919 रोजी गांधीजींनी या कायद्याविरुद्ध देशभर हरताळ पाळण्याचे आवाहन केले त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.

**३. असहकार चळवळ**

रौलेट कायद्याविरुद्ध जनमत प्रक्षुब्ध बनल्याने इंग्रज सरकारने डॉ. सैफुदिन किचलु, डॉ सत्यपाल या प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. जनरल डायर या लष्करी अधिकाऱ्याने अमृतसरमध्ये सभाबंदीचा हुकुम काढला याचा निषेध करण्यासाठी अमृतसरमधील जालीयनवाला बाग येथे सभा भरली होती. या सभेततील जमावावर जनरल डायरने दारुगोळा संपेपर्यंत गोळीबार करण्याचा आदेश दिला. यात झाडलेल्या 1600 फैरी मध्ये 400 लोक मत्युमुखी पडले आणि 200 हुन अधीक लोक जखमी झाले यामुळे देशभर संतापाची लाट उसळली.

या घटनेमुळे महात्मा गांधीजी तसेच इतर सर्व भारतीयांचा इंग्रजांच्या न्यायबुध्दी वरील उरला सुरला विश्वासही उडाला.

तूर्कस्तानचा सुल्तान हा जगभरातील मुस्लिमांचा खलिफा होता. पहिल्या महायुध्दात तुर्कस्तान ब्रिटीशांच्या विरोधात होते व ते जर्मनीच्या बाजुने लढले होते या ब्रिटीशांनी तुर्कस्तानवर निर्बंध लादले याने भारतातील मस्लिम नाराज झाले. म्हणुन खलिफाला पाठींबा देण्यासाठी खिलाफत चळवळ सुरु झाली नोव्हेंबर 1919 मध्ये दिल्ली येथे भरलेल्या खिलाफत चळवळीचे अध्यक्ष महात्मा गांधी होते हिंदु-मुस्लिम ऐक्य घडवुन ब्रिटीशाविरुध्द ताकद वाढविण्यासाठी गांधीजींनी खिलाफतला पाठींबा दिला. याबदल्यात सरकारशी असहकार करण्याचा प्रस्ताव मुस्लिमांनी मान्य केला.

ऑगस्ट 1920 रोजी असहकाराच्या देशव्यापी आंदोलनास सुरुवात झाली. आता इथुन पुढे इंग्रज सरकारला कसलेही सहकार्य करायचे नाही, हे सर्वानुमते ठरवण्यात आले. 4 सप्टेंबर 1920 रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कॉग्रेसचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले. 26 डिसेंबर 1920 च्या अधिवेशनात राष्ट्रसभेने असहकाराच्या ठरावास मान्यता दिली आणि या अधिवेशनाचे अध्यक्ष होते सी. व्ही. राघवाचार्य. आंदोलनाची सर्व सुत्रे गांधीजींकडे सोपविण्यात आली. खऱ्या अर्थाने 1 ऑगस्ट 1920 पासुन प्रत्यक्ष असहकारास सुरुवात झाली.

शाळा, महाविदयालये, विधीमंडळे, न्यायलये, कचेऱ्या, परदेशी माल यावर बहिष्कार टाकुन स्वदेशीचा पुरस्कार करण्यात आला. देशभर राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था स्थापन करण्यात आल्या सी आर दास, मोतीलाल नेहरु, डॉ. एम. आर. जयकर सैफुदीन किचलु, वल्लभभाई पटेल, सी. राजगोपालचारी अशा प्रसिध्द वकीलांनी आपल्या व्यवसायाचा त्याग केला. महात्मा गांधींनी “कैसर-इ-हिंद” या पदवीचा तर टागोरांनी “सर ”या पदवीचा तसेच सुभाषचंद्र बोस यांनी आय.सी.एस या पदाचा त्याग केला. परदेशी मालाची होळी करण्यात आली. या आंदोलनात स्त्रियांचा सहभाग जास्त होता. 17 नोव्हेंबर 1921 रोजी प्रिंस ऑफ वेल्स भारत भेटीवर आले हा दिवस निषेध दिन म्हणुन पाळण्यात आला. 1921 या एकाच वर्षात 396 संप झाले “टिळक स्वराज्य फंडासाठी “गांधीजींच्या म्हणयानुसार लोकांनी एक कोटीहुन अधिक रक्कम जमा केली (टिळकांच्या स्मरणार्थ). आणि “स्वराज्य” व स्वदेशी  यांचे प्रतिक असलेला चरखा घराघरात पोहोचला. उत्तर प्रदेशातील गोरखपुर जिल्हयात चौरीचौरा येथे 5 फेब्रुवारी 1922 रोजी शांततापुर्ण निदर्शने  करणाऱ्या आंदोलकांवर पोलीसांनी गोळीबार केला. यामुळे जमाव संतप्त झाला व त्यांनी पोलीसस्टेशनला आग लावली. या आगीत 21 कॉन्सटेबल एक सबइन्स्पेकटर असे 22 पोलीस मरण पावले.

“चळवळ अहिंसक असली पाहीजे” हे मानणाऱ्या गांधीजींनी या घटनेने व्यथित होवुन 12 फेब्रुवारी 1922 रोजी असहकार आंदोलन तात्काळ थांबवण्याचे आदेश दिले. 10 मार्च 1922 रोजी गांधीजीवर कलम (124-अ) नुसार राजद्रोहाचा आरोप ठेवुन सरकारने सहा वर्षाची शिक्षा ठोठावली. फेब्रुवारी 1924 मध्ये प्रकृती अस्वास्थ्यामुळे तुरुंगातुन मुक्तता करण्यात आली.

**४. सविनय कायदेभंग (1930)**

1929 च्या लाहोर अधिवेशनात “संपुर्ण स्वराज्य” हे राष्ट्रसभेचे ध्येय ठरवण्यात आले. याच अधिवेशनात सविनय कायदेभंगाचा ठराव संमत करण्यात आला. गांधीजीनी तडजोडीसाठी सरकारकडे संपुर्ण दारुबंदी, कैद्यांची सारामाफी, देशी मालास संरक्षण, राजकीय कैद्यांची मुक्तता इत्यादी. मुद्दे जाहीर केले. सरकारने या मुद्‌द्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे 14 फेब्रुवारी 1930 रोजी म.गांधीजींनी भारतीय जनतेस सविनय कायदेभंगाचा आदेश दिला.

**सविनय कायदेभंगाचे स्वरुप**

ब्रिटीशांचे सर्व जुलमी कायदे मोडण्यासाठी प्रतिकात्मक असा मिठाचा सत्याग्रह करण्यात आला.

**दांडीयात्रा**

मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी 12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी 78 अनुयायांसह गुजरातमधील साबरमती आश्रमातुन 385 कि.मी. वरील दांडी (गुजरात) येथे प्रयाण केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दांडीयात्रेची तुलना “नेपोलियन एल्बवरुन पॅरिसकडे गेला” या घटनेशी केली. 5 एप्रिल 1930 रोजी 24 दिवसांत गांधीजी दांडी येथे पोहोचले. 6 एप्रिल 1930 रोजी दांडी समुद्रकिनाऱ्यावर गांधीजींनी मीठाचा कायदा मोडला व कायदेभंग चळवळीस प्रारंभ केला.

भारतात जेथे जेथे समुद्रकिनारा होता (महाराष्ट्र , बंगाल, ओरीसा, चेन्नई इ. ठिकाणी मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. जेथे समुद्रकिनारा नव्हता तेथे इतर अन्यायकारक कायदयाचा भंग करण्यात आला. उदा. साताऱ्याजवळील बिळाशी येथील जंगल सत्याग्रह. महिलांनी मोठया प्रमाणावर सहभाग घेतला. महाराष्ट्रातील वडाळा येथे सत्याग्रह झाला होता. देशभरात जंगल सत्याग्रहींची संख्या 70 हजारांवर होती.

**गोलमेज परिषद व गांधी-आयर्विन करार**

सायमन कमीशनने आपला अहवाल 27 मे 1930 रोजी प्रसिध्द केला. यातील शिफारशी नाकारण्यात आल्याने त्यावर विचार करण्यासाठी लंडनमध्ये तीन गोलमेज परिषदा घेण्यात आल्या.

**उद्देश**

भारतासाठी नव्या राजकिय घटनात्यक सुधारणांचा आराखडा तयार करणे.

भारतासाठी राष्ट्रसभेने पहिल्या गोलमेज परिषदेत भाग घेतला नाही. त्यामुळे ही परिषद निरर्थक ठरली. मग व्हाईसराय आयार्विन याने गांधीजींशी बोलणी सुरु केली.

**गांधी आयर्विन करार (5 मार्च 1931)**

सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित करण्याचे मान्य करतांना गांधीजींनी या करारनुसार पुढील तडजोडी मांडल्या.

१. कायदेभंगाच्या सत्याग्रहींची तुरुंगातुन सुटका करण्यात यावी.

२. समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांना मीठ तयार करण्याची परवानगी देण्यात यावी.

३. मिठावरील जाचक कर रद्द करावा.

या करारनुसार गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहीले.

**दुसरी गोलमेज परिषद**

(7 सप्टेंबर 1931) लंडन येथे झाली. गांधीजी या परिषदेला हजर होते. भारताला त्वरीत संपुर्ण स्वातंत्र्याची मागणी त्यांनी केली. त्यांची ही मागणी मान्य झाली नाही.

संपुर्ण स्वराज्याची मागणी फेटाळल्याने गांधीजी डिसेंबर 1931 मध्ये ते भारतात आले व 3 जानेवारी 1932 रोजी गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ तीव्र केली. जानेवारी 1932 मध्ये गांधीजींना अटक करुन येरवाडा येथे डांबण्यात आले.

दुसऱ्या गोलमेज परिषदेवर व जातीय निवाडयावर गांधीजींची टिका, "मागीतली भाकरी मिळाला धोंडा".

**तिसरी गोलमेज परिषद**

(17 नोव्हेंबर 1932 ते 24 डिसेंबर 1932) या काळात तुरुगांतच गांधीजींनी "हरीजन सेवक संघाची" स्थापना केली. या परिषदेस राष्ट्रीय परिषदेचा एकही प्रतिनिधी हजर न राहील्याने ही परिषद अपयशी झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून तीन्ही परिषदांना हजर होते. 8 मे 1933 रोजी गांधीजींनी येरवडा तुरुंगात आत्मशुद्धीसाठी 21 दिवसाचे उपोषण सुरु केले. याच दिवशी सरकारने त्यांची मुक्तता केली. एप्रिल 1934 मध्ये सविनय कायदे- भंगाची चळवळ पूर्णतः मागे घेण्यात आली.

**५. भारत छोड़ो**

यावेळी विन्स्टन चर्चिल हे ब्रिटनचे पंतप्रधान होते. क्रिप्स शिष्टाई (मार्च 1942) फसल्याने चळवळ अधिक तीव्र केली. 8 ऑगस्ट रोजी गांधीजींनी "करा किंवा मरा" हा संदेश दिला. याशिवाय "ब्रिटीशांनी भारतातून चालते व्हा", असे ठणकावून सांगितले भूमिग़त आंदोलने सुरू झाली, प्रतिसरकारे स्थापन झाली.

अशा प्रकारे 1942 पासून चाललेल्या छोडो भारत चळवळीचा गोड शेवट 1947 च्या स्वातंत्र्य प्राप्तीने झाला.

**सारांश**

काही टिकाकार सार्वभौम सत्तेला आव्हान देण्याच्या गांधीच्या कृतीबद्दल त्यांना अराजक माजविणारे विचारवंत असे म्हणतात. गांधीना केवळ राजकिय स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते. तर जनतेची आर्थिक, सामजिक, आत्मिक उन्नतीही अपेक्षित होती. त्याच भावनेतून त्यांनी ग्रामोद्योग संघ, बुनियादी शिक्षण, गौरक्षण संस्था स्थापन केल्या. गांधीजींच्या आर्थिक कार्यक्रमाचे प्रतिक खादी होते.

गांधीजींनी चंपारण्य सत्यागृहापासून राष्ट्रसेवेत स्वत: ला झोकून दिले ते आयुष्याच्या शेवटपर्यत. शेतकऱ्यांच्या चळवळी या कालही चालू होत्या आजही चालू आहेत आणि उद्या देखील चालू असतील हे शाश्वत सत्य आहे. राष्ट्राची प्रगती करण्यासाठी शेतकरी समृद्ध झाला पाहिजे असे देखील जाणवते. गांधीजींनी अहिंसेच्या मार्गाने देखील आंदोलन

केले जाऊन आपण आपले हक्क प्राप्त करून घेऊ शकतो हे देखील दाखवून दिले. जगाला दिलेला अहिंसेचा मार्ग हा आजही प्रभावी असून येणाऱ्या शेकडो पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारा आहे. असहकार चळवळ असो वा खिलाफत चळवळ, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेषित म्हणून देखिल त्यांचा गौरव केला जातो. तत्कालिन ब्रिटीश सरकारच्या विरोधात अहिंसेच्या मार्गाने जो लढा उभारला होता तो वाखाणण्याजोगा आहे. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी देखिल ते प्रयत्नशील होते अस्पृश्यांना हरिजन असे संबोधित होते. हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी आणि दारुबंदीसाठी गांधीजींनी अथक प्रयत्न केले. भारताच्या फाळणीला गांधी जबाबदार आहेत असे मानणाऱ्या एका व्यक्तीने 30 जानेवारी 1948 रोजी गोळी घालून ठार केले आणि येथेच पर्वाचा एका येथेच एका महान शेवट झाला.

**संदर्भ ग्रंथ**

१. Wikipedia – Internet, Google.
२. आधुनिक भारताचा इतिहास (बी.एल.ग्रोवर आणि एन.के.बेल्हेकर)
३. आधुनिक भारताचा इतिहास (डॉ.अनिल कठारे)